**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७६/२०१९** **दिनांक २०/०९/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १४/०९/२०१९ ते २०/०९/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २१/०९/२०१९ सकाळी ८:३० पासून २५/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१४/०९** | **१५/०९** | **१६/०९** | **१७/०९** | **१८/०९** | **१९/०९** | **२०/०९** | | **२१/०९** | **२२/०९** | **२३/०९** | **२४/०९** | **२५/०९** |
| ८४.८ | ५१.४ | १६.२ | ५८.४ | ५९.४ | ४३.४ | ९.२ | **पाऊस (मिमी)** | १० | ९ | ११ | ० | १२ |
| २८.८ | २९.२ | २६.८ | २६.६ | २५.६ | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३० | ३० | ३१ | ३२ | ३२ |
| २३.६ | २३.० | २४.० | २३.० | २२.८ | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २४ | २४ | २५ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ७ | ६ | ३ | ८ |
| ९३ | ९८ | ९८ | ९८ | ९८ | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९२ | ९४ | ९४ | ९४ |
| ८९ | ९० | ९५ | ९६ | ८८ | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७७ | ७७ | ८० | ७१ | ७१ |
| ३.७ | २.९ | १.४ | २.२ | १.० | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ११ | १२ | ८ | ६ | २ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | - | - | **वाऱ्याची दिशा** | आ. | आ. | आ. | आ.पू. | आ.पू. |

| | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ३२२.८ | ४८१२.० | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २१ ते २३ व २५ सप्टेंबर,२०१९ पर्यंत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक २० ते २६ सप्टेंबर,२०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा आणि प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पोटरी ते फुलोरा अवस्था** | • भात पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• पाउसाची उघडझाप व ढगाळ वातावरणामुळे भात पिकावर बुरशीजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ट्रायसायक्लोझोल ७५ % पा. मि. भुकटी १० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारावी.<br>• पुढील पाच दिवस पाउसाची उघडझाप असून ढगाळ वातावरण असण्याची शक्यता असल्यामुळे पाणी साचून राहणाऱ्या भात खाचरात तसेच जेथे घट्ट लागवड आणि नत्र खताची अवाजवी मात्रा दिली असलेल्या क्षेत्रात तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. पिकाचे तपकिरी तुडतुड्यांचा प्रादुर्भावावर सातत्याने लक्ष ठेवावे. जर रोपाच्या चुडात ५ ते १० तुडतुडे आढळल्यास ॲसिफेट ७५ टक्के पाण्यात विरघळणारी भुकटी २.२५ ग्रॅम किंवा फिप्रोनिल ५ टक्के प्रवाही २ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ०.२ मि.ली प्रति लिटर पाण्यातून भात पिकावर फवारावे. तसेच खाचरात पाणी जास्त काळ न साठता फोडून लावावे व नवीन पाणी साठवण्याची व्यवस्था करावी. टिप : फवारणी करताना कीटकनाशक चुडाच्या बुंध्यावर पडेल याची दक्षता घ्यावी. |
| **आंबा** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने कोवळ्या पालवीचे तुडतुड्यापासून पासून संरक्षण करण्यासाठी डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ९ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा बागेतील रोपांवर शेंडे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास कीडग्रस्त पालवी अळीसहित नष्ट करावी व क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा मोनोक्रोटोफस ३६ टक्के प्रवाही ११ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **काजू** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे काजूला नवीन पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण असल्याने पालवीचे ढेकण्या व फुलकिडी पासून संरक्षण करण्यासाठी नवीन पालवी फुटण्याच्या वेळी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | -- | • फुलोऱ्यावर असलेल्या हिरवा चाऱ्याची मुरघास पद्धतीने साठवण करावी. |

**टीप: फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**